**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०१/२०१४-१५/१३९ दिनांक: २७.१०.२०१५

आदेश केस क्र. ०१/१४-१५

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. राजेंद्र बाळासाहेब सुर्यवंशी<br>मु. पो. ऐतवडे खुर्द, ता. वाळवा,<br>जिल्हा. सांगली | : | अर्जदार. |
| | विरुध्द | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जिल्हा. सांगली. | | |

**कोरमः-** १. श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. एन. बी. बारसिंग, सदस्य, सचिव, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

(१) तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी .

आज दिनांक १५-१०-२०१५ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर येथील अर्जदार ग्राहक श्री. राजेंद्र बाळासाहेब सुर्यवंशी, मु. पो. ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जिल्हा. सांगली. ग्राहक क्र. २८४२४०१७५३६१ हे स्वतः सुनावणीसाठी प्रत्यक्ष हजर नव्हते. महावितरण तर्फे (वि.प), कार्यकारी अभियंता तथा नोडल अधिकारी श्री. विक्रांत सपाटे, उपकार्यकारी अभियंता, इस्लामपूर व श्री. यु. एम. शेख, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर हे हजर होते.

अर्जदार श्री. सुर्यवंशी यांनी अ फॉर्ममध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली व माझे माहे जुन २०१४ चे देयक दुरुस्त करुन मिळावे वीज देयकावर चुकीचा फोटो छापणे मिटर घराच्याबाहेर पोर्चमध्ये असताना लॉक्ड् असे लिहीणे या सेवेतील त्रुटीबाबत संबंधीतावर कारवाई करण्यात यावी, तसेच माझ्या तक्रारीची दखल न घेतल्याबाबत संबंधीतावर कारवाई व्हावी आणी माझे आर्थीक नुकसान भरुन मिळावे अशी मागणी केली होती. सुनावणी दरम्यान श्री. सपाटे आणि श्री. शेख यांनी सदर ग्राहकाची तक्रार पुर्णपणे सोडवली असून ग्राहकाचे समाधान झाल्याचे सांगीतले. आणि श्री. सुर्यवंशी यांचे दिनांक १२-१०-२०१५ चे पत्र मंचासमोर सादर केले. त्यामध्ये त्यांनी माझ्या तक्रारीबाबत मला समाधान कारक उत्तर मिळाल्यामुळे माझी या संदर्भात तक्रार नाही. तसेच दिनांक १५-१०-२०१५ रोजी मी माझ्या वैयक्तीक कारणामुळे हजर राहू शकत नाही त्याबद्दल समस्वः अशा अर्थाचा अर्ज सादर केला. यावर मंचाचे समाधान झाले. यावरुन खालील मुद्दा उपस्थित होतो.

१) सदर अर्ज निकाली काढता येईल काय?.

उत्तर : होय.

२) आदेश

अंतिम आदेशाप्रमाणे.

**निष्कर्ष व कारण मिमांसा.**

वरील सर्व चर्चा आणि सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री. सुर्यवंशी यांची तक्रार महावितरणच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी सोडवल्याच्या निष्कर्षापर्यंत मंच येत आहे. श्री. सुर्यवंशी यानी आपली तक्रार मिटल्याचे लेखी पत्र सादर केले आहे. सबब, ही तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१) अर्जदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : २७-१०-२०१५

(एन. बी.बारसिंग)
सदस्य सचिव

अध्यक्ष पद दिनांक १६-१२-२०१४ पासून रिक्त.

श्री. पी. एस. बुरांडे,
सदस्य,

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.